दै. प्रजावाणी दि. 18.01.2025

पोक्सोअंतर्गत दाखल होता गुन्हा

# ६५ वर्षांच्या इसमाला २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा

प्रतिनिधी • नांदेड

घराशेजारी राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीला घरात बोलावून घराच्यावरच्या मजल्यावर पैशाचे पाकिट आण असे सांगत तिच्यावर अत्याचार करणाऱ्या ६५ वर्षीय आरोपीला येथील न्यायालयाने २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. सदर घटना सन २०२३ या कालावधीत शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हद्दित घडली होती.

एक अल्पवयीन बालिका किराणा दुकानातून चहापत्ती व अन्य साहित्य आणण्यासाठी जात होती. यावेळी तिच्या घराच्या शेजारी राहणाऱ्या कचरू नरहरी सरोदे या ६५ वर्षीय इसमाने तिला थांबवून घरात बोलाविले. घराच्या वरच्या मजल्यावर ठेवलेले पैशाचे पाकिट आणण्यास सांगितले. सदर बालिका वरच्या मजल्यावर गेल्यानंतर तिच्या मागेच कचरू सरोदे गेला. बालिकेसोबत लगट केल्यानंतर कोणाला सांगशील तर जीव मारण्याची धमकी दिली. अत्याचारीत पिडीतेने ही बाब आईला सांगितल्याने त्यांनी शिवाजीनगर पोलीस स्टेशन गाठले. या प्रकरणी कचरू सरोदे याच्याविरूद्ध शिवाजीनगर ठाण्यात कलम ३७६ (३), ३७६ (अब), ५०६ तसेच पोक्सो कलम ४,६,८, नुकसान गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीला अटक करून सदर घटनेचा तपास सपोनि उमाकांत पुणे यांनी करून आरोपीविरूद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयात या प्रकरणी दहा साक्षीदार तपासण्यात आले. दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर उपलब्ध पुराव्याआधारे आरोपी कचरू नरहरी सरोदे यास विविध कलमाअंतर्गत २० वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा न्यायालयाने सुनावली. यावेळी सरकार पक्षाच्यावतीने सहाय्यक सरकारी वकील एम.ए. बत्तुल्ला यांनी प्रबळ व प्रभावीपणे बाजु मांडली. तर पैरवी अधिकारी म्हणून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रामराव ढोले यांनी काम पाहिले.